# राज्यसेवा पूर्व परीक्षा 2013

# सामान्य अध्ययन पेपर -1

**प्र. 1 खालीलपैकी एक ब्रिटिश नेता आणि संसद सदस्याने स्वीकारले की, 1857 चा उठाव सैनिको विद्रोह नसून 'राष्ट्रीय उठाव' होता:**

(1) लॉर्ड डलहौसी (2) लॉर्ड कॅनिंग
(3) विल्यम ग्लॅडस्टोन (4) बेंजामिन डिझरायली

➡ **The following leading British Parliamentarian and Politician admitted that the Revolt of 1857 was a National Revolt and not a Military Mutiny :**

(1) Lord Dalhousie (2) Lord Canning
(3) William Gladstone (4) Benjamin Disraeli

---

**प्र. 2 ''ज्या युद्धामुळे स्वातंत्र्य वा लोकशाही मिळणार नाही, कामगारवर्गाला ज्यापासून काहीच फायदा होणार नाही, त्या युद्धात भारताने सहभागी होऊ नये'' – हा ठराव 1940 साली कोणी केला?**

(1) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (2) मुस्लिम लीग
(3) ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस (आयटक)
(4) हिंदू महासभा

➡ **Which organization passed the following resolution in 1940 ? India should not take part in a war which will neither bring freedom or democracy, nor will the workers benefit in any way from it.**

(1) Indian National Congress
(2) Muslim League
(3) All India Trade Union Congress (AITUC)
(4) Hindu Mahasabha

---

**प्र.3 गांधार कलाशैली ........... कलाशैलीने प्रभावित झालेली होती.**

(1) ग्रीक व चीनी (2) युनानी व रोमन
(3) पर्शियन व ग्रीक (4) चीनी व पर्शियन

➡ **Gandhar art was influenced by ........... art.**

(1) Greek and Chinese (2) Unani and Roman
(3) Persian and Greek (4) Chinese and Persian

---

**प्र. 4 रोगांच्या उपचारासाठी उपयोगी प्रजातींची यादी :**

(a) विलो वनस्पती (b) यू वृक्ष
(c) डॉग फिश
(d) वाईन (ॲनसिस्ट्रोक्लॅडस कोरुपेनीस)
(e) बेडूक (इपिडोबेटीस ट्रायकलर)

**वरीलपैकी कोणती/कोणत्या प्रजाती कर्करोगावर उपचारासाठी वापरण्यात येणारे 'टॅक्सॉल' हे रसायन काढण्यासाठी वापरली जाते/वापरल्या जातात?**

(1) (a) (2) (b)
(3) (c) आणि (e) (4) (d)

➡ **List of the species useful for the treatment of diseases:**

(a) Willow plant (b) Yew tree
(c) Dog fish
(d) Wine (Ancistrocladus korupenis)
(e) Frog (Epidobutes tricolor) &

➡ **Which species is/are used for the isolation of 'taxol' which is used for the treatment of cancer?**

(1) (a) (2) (b)
(3) (c) and (e) (4) (d)

---

**प्र. 5 मध्ययुगाच्या सुरुवातीला भारतीय इतिहासात पुढील दोन वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह दिसून येतात.**

(a) अद्वैत, वेदांत अशा तत्त्वज्ञानांचा विस्तार
(b) बौद्ध तत्त्वज्ञानानुसार शिल्पकलेची प्रगती
(c) चिदंबरम्, मदुराई अशा मंदिरकेंद्री नगरांचा विकास
(d) रोमन साम्राज्याबरोबर व्यापार

**पर्याय उत्तरे :**

(1) (c), (d) (2) (b), (c)
(3) (a), (c) (4) (a), (d)

➡ **We find the following two specific trends at the beginning of the middle age in Indian History.**

(a) Rise of philosophies like Advaita, Vedanta
(b) Progress in sculpture as per Buddhism
(c) Development of temple towns like Chidambaram, Madurai
(d) Trade with Roman empire

**Answer Options :**

(1) (c), (d) (2) (b), (c)
(3) (a), (c) (4) (a), (d)

---

**प्र. 6 सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे उद्दिष्ट कोणते?**

(1) कायदे मोडून प्रशासनाला जेरीस आणणे
(2) सरकारकडून अधिक मागण्या मान्य करून घेणे
(3) गोलमेज परिषदेत कॉंग्रेससाठी स्थान मिळवणे
(4) वैयक्तिक सत्याग्रह लोकप्रिय करणे

➡ **What was the aim of the Civil Disobedience Movement ?**

(1) Paralysing the administration by taking law into the hands
(2) Make the government concede more demands

(3) Secure a place for the Congress in the Round Table Conference
(4) To popularise individual Satyagraha

**प्र. 7 खालीलपैकी कोणता असहकार चळवळीचा भाग नव्हता?**
(1) शाळांवरील बहिष्कार
(2) न्यायालयांवरील बहिष्कार
(3) परदेशी कापडांवरील बहिष्कार
(4) कर न भरणे

➨ **Which of the following was not a part of the Non-cooperation Movement ?**
(1) Boycott of schools
(2) Boycott of the courts
(3) Boycott of the foreign cloth
(4) Non-payment of Tax

**प्र. 8 नद्या व त्यांच्या वैदिक नावांच्या जोड्या लावा.**

(a) सरसुती — (i) चिनाब
(b) परूष्णी — (ii) झेलम
(c) असिकनि — (iii) सरस्वती
(d) वितस्ता — (iv) रावी

**पर्याय उत्तरे :**

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

➨ **Match the rivers with their vedic names.**

(A) Sarsuti — (i) Chenab
(B) Parushni — (ii) Jhelam
(C) Asikni — (iii) Saraswati
(D) Vitasta — (iv) Ravi

**Answer Options :**

| | (A) | (B) | (C) | (D) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

**प्र. 9 मध्य आशियातून आलेल्या आक्रमणांपुढे उत्तर भारतीय राजसत्ता पराभूत झाल्या कारण :**
(a) भारतीय सैनिकांना लूट मिळण्याची शक्यता नव्हती.
(b) जातिभेदामुळे भारतीय सैनिकात एकोपा नव्हता.
(c) मध्य अशियाई सैन्याची शस्त्रास्त्रे अधिक आधुनिक होती.
(d) आक्रमक सैन्याचे नेतृत्व गुलाम लोक करीत होते.

**पर्याय उत्तरे :**
(1) (a), (b) (2) (b), (d)
(3) (c), (d) (4) (a), (c)

➨ **North Indian powers were defeated at the hands of invaders from Central Asia because :**
(a) Indian soldiers could not hope to get plunder.
(b) There was no unity among Indian soldiers due to casteism.
(c) Central Asian soldiers had more modern weapons.
(d) The invading army was led by slaves.

**Answer Options :**
(1) (a), (b) (2) (b), (d)
(3) (c), (d) (4) (a), (c)

**प्र.10 जवाहरलाल नेहरूंबाबत पुढीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?**
(a) ते स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर नियोजन आयोगाचे प्रमुख होते.
(b) त्यांनी अनेकदा भारतीय विज्ञान परिषदेचे अध्यक्षपद भूषवले.
(c) नेहरू रिपोर्ट लिहून त्यांनी भारतासाठी आदर्श राजपद्धतीचा आराखडा मांडला.
(d) 'मला पाश्चात्त्य जगात उपऱ्यासारखे वाटते, पण मायदेशातही कधी कधी परक्यासारखे वाटते.' असे त्यांचे मत होते.

**पर्याय उत्तरे :**
(1) (a), (b), (d) (2) (a), (b), (c)
(3) (a), (c), (d) (4) (b), (c), (d)

➨ **Which of the following statements about Jawaharlal Nehru are true ?**
(a) He chaired the Planning Commission before and after independence.
(b) He presided over many sessions of Indian Science Congress.
(c) Authoring the Nehru report, he drew an ideal outline for Indian government.
(d) "I feel like an exile in the West, but sometimes I feel I am an outsider even in my own country." He felt.

**Answer Options :**
(1) (a), (b), (d) (2) (a), (b), (c)
(3) (a), (c), (d) (4) (b), (c), (d)

**प्र.11 गांधी-आयर्विन करारामुळे काय साध्य झाले?**
(1) पूर्ण स्वराज्याच्या मागणीला मान्यता मिळाली.
(2) मिठावरील कर रद्द झाला.
(3) गांधीजीनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला.
(4) वरीलपैकी काहीही नाही.

➨ **What was the outcome of the Gandhi - Irwin Pact ?**
(1) The demand for Purna Swaraj was accepted.
(2) Salt tax was abolished.
(3) Gandhiji resigned from Congress membership.
(4) None of the above.

**प्र.12 कालानुक्रमे रचना करा.**

(a) मुस्लीम लीगने नेहरू रिपोर्टपेक्षा जिनांच्या चौदा कलमी कार्यक्रमास पसंती दिली.

(b) काँग्रेसने सरकारला एका वर्षात नेहरू रिपोर्ट स्वीकारण्याची मुदत दिली.

(c) लाहोर अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली.

(d) गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.

**पर्याय उत्तरे :**

(1) (a), (c), (d), (b) (2) (d), (b), (a), (c)

(3) (b), (a), (c), (d) (4) (a), (b), (c), (d)

➨ **Arrange in chronological order.**

(a) Muslim League gave preference to the Fourteen Points of Jinnah rather than the Nehru Report.

(b) Congress asked the government to accept the Nehru Report within one year.

(c) Congress demanded 'Purna Swaraj' (Complete Independence) in the Lahore session.

(d) Gandhiji started Salt Satyagraha

**Answer Options :**

(1) (a), (c), (d), (b) (2) (d), (b), (a), (c)

(3) (b), (a), (c), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

**प्र.13 इ. स. 1927 मध्ये सायमन कमिशन नेमण्यात आले कारण :**

(1) 1919 सालचा माँटेग्यू चेम्सफोर्ड कायदा निष्प्रभ ठरला होता.

(2) मंजूर पक्षाकडे सत्तापालट झाला तर तो भारताला अनुकूल धोरण आखण्याची धास्ती होती.

(3) स्वराज पक्षाच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे गरजेचे होते.

(4) वरील सर्व

➨ **Simon Commission was appointed in 1927 because :**

(1) 1919 Montegue-Chelmsford act could not achieve much.

(2) If the labour party was to come to power, they would bring pro-India policies.

(3) It was necessary to thwart the increasing prominence of Swaraj Party.

(4) All the above

---

**प्र.14 खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा.**

(a) या व्यक्तीस मुंबईचे शिल्पकार (वास्तुविशारद) म्हणतात.

(b) आचार्य अत्रे यांनी त्यांना शिरपेच न चढवलेला मुंबईचा सम्राट (Uncrowned Emperor of Mumbai) म्हंटले.

(c) ते मराठी, इंग्रजी व संस्कृतमध्ये उत्कृष्ट होते.

(d) त्यांचे एलफिन्स्टन कॉलेज वर बरेच उपकार/ऋण आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दादाभाई नौरोजी (2) डी.पी. तरखडकर

(3) जगन्नाथ शंकर सेठ (4) बाळासाहेब ठाकरे

➨ **Name the person described below :**

(a) He is called the architect of Mumbai.

(b) Acharya Atre called him Uncrowned Emperor of Mumbai.

(c) He was excellent in Marathi, English and Sanskrit.

(d) Elphinstone college owes a lot to him

**Answer Options :**

(1) Dadabhai Naoroji

(2) D. P. Tarkhadkar

(3) Jagannath Shankar Sheth

(4) Balasaheb Thakre

---

**प्र.15 'खोती पद्धत' कोठे होती?**

(1) मराठवाडा (2) खानदेश

(3) विदर्भ (4) कोकण

➨ **Where was 'Khoti System' being implemented ?**

(1) Marathwada (2) Khandesh

(3) Vidarbha (4) Konkan

---

**प्र.16 गन पावडर हे एक मिश्रण आहे जे पेटविल्यास रासायनिक प्रक्रिया होऊन स्फोट होतो. या मिश्रणात पुढील बाबी असतात :**

(a) पोटॅशियम नायट्रेट (b) कोळशाची पावडर

(c) सल्फर (d) सोडियम कॉर्बोनेट

(e) कॅल्शियम सल्फेट

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d)

(3) (a), (b), (e) (4) (a), (c), (d)

➨ **Gun powder is a mixture which when ignited a number of chemical reactions take place producing explosion. It consists of :**

(a) Potassium nitrate (b) Powdered charcoal

(c) Sulphur (d) Sodium Carbonate

(e) Calcium Sulphate

**Answer Options :**

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d)

(3) (a), (b), (e) (4) (a), (c), (d)

---

**प्र.17 खालील दोन विधाने पाहावीत :**

(a) भारतात प्रतिमाणशी कृषीक्षेत्राची उपलब्धता सन 1951 च्या 0.48 हेक्टरपासून 1991 पर्यंत 0.16 हेक्टर एवढी कमी झाली व ती 2035 पर्यंत 0.08 हेक्टरपर्यंत खाली जाण्याची शक्यता आहे.

(b) कृषीक्षेत्राची उपलबधता कमी होण्याचे प्रमुख कारण वाढती लोकसंख्या व कृषी क्षेत्राचे अकृषी क्षेत्राकडे वळतीकरण आहे.

**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?**

(1) (b) विधान योग्य, (a) नाही.

(2) (a) विधान योग्य, (b) नाही.

(3) दोन्ही विधाने बरोबर व (b), (a) ची कारणमीमांसा देते.

(4) दोन्ही विधाने बरोबर परंतु (b), (a) ची कारणमीमांसा देत नाही.

➨ **Consider the following two statements :**

(a) In India per capita availability of agricultural land has declined from 0.48 hectare in 1951 to 0.16 hectare in 1991 and is projected to slide down to 0.08 hectare in 2035

(b) The decline in the extent of agricultural land is mainly due to increase in population and diversion of agricultural land for non-agricultural purposes. Now state whether.

**Answer Options :**

(1) (b) is correct, (a) is not
(2) (a) is correct, (b) is not
(3) Both are correct and (b) is a correct reasoning of (a)
(4) Both are correct but (b) is not the reasoning for (a)

**प्र.18 मुंबई हायमधे भारताच्या एकूण उत्पादनाच्या 63% खनिज तेल तर 80% नैसर्गिक वायूचे उत्पादन होते. ओ.एन.जी.सी. ला येथे सर्वप्रथम 1974 मधे तेल लागले. हे खनिज तेल कोणत्या कालावधीचे आहे?**

(1) इओसीन (2) मायोसीन
(3) प्लायोसीन (4) प्लीस्टोसीन

➨ **Mumbai High accounts for 63% of petroleum production in India and produces about 80% of India's natural gas. The ONGC struck oil here in 1974. To which period does this oil belong :**

(1) Eocene (2) Miocene
(3) Pliocene (4) Pleistocene

**प्र.19 पुढील क्षेत्रांचा नीट विचार करा :**

(a) ॲंडिज पर्वत (b) न्यूझीलंड
(c) फिलीपाईन्स (d) तैवान

**वरीलपैकी कोणता 'अग्नीकंकणाचा' भाग आहे?**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b)
(3) (b), (c) आणि (d) (4) (a), (b), (c) आणि (d)

➨ **Consider the following areas :**

(a) Andese Mountain (b) New Zealand
(c) Philippines (d) Taiwan

**Which of the above form a part of 'Ring of Fire'?**

(1) only (a) (2) (a) and (b)
(3) (b), (c) and (d) (4) (a), (b), (c) and (d)

**प्र.20 नदी आपल्या संपूर्ण प्रवाहात वेगवेगळे भू-आकार निर्माण करत असते. खालीलपैकी कोणता भू-आकार नदी आपल्या वरच्या टप्प्यात निर्माण करत नाही?**

(1) घळई (2) धावऱ्या (Rapids)
(3) धबधबा (4) डोंगर बाहू

➨ **A river produces various landforms during its entire course. Which of the following landforms is not produced by a river in its upper course ?**

(1) Gorge (2) Rapids
(3) Water fall (4) Spur

**प्र.21 खालील नद्यांचा त्यांच्या खोऱ्यांच्या क्षेत्रफळानुसार उतरता क्रम लावा.**

(a) ब्रह्मपुत्र (b) कृष्णा (c) तापी (d) कावेरी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b), (a), (d), (c) (2) (b), (d), (c), (a)
(3) (a), (b), (d), (c) (4) (a), (c), (b), (d)

➨ **Arrange the following rivers in descending order of their basin area :**

(a) Brahmputra (b) Krishna
(c) Tapi (d) Kaveri

**Answer Options :**

(1) (b), (a), (d), (c) (2) (b), (d), (c), (a)
(3) (a), (b), (d), (c) (4) (a), (c), (b), (d)

**प्र.22 कोणत्या प्रदेशामध्ये वस्त्यांचे वितरण पूर पातळीद्वारा निश्चित होईल?**

(1) नर्मदेचा त्रिभुज प्रदेश (2) रोहिलखंड
(3) माळवा (4) रामनाड

➨ **In which areas settlement distribution will be decided by flood water level ?**

(1) Narmada delta (2) Rohilkhand
(3) Malwa (4) Ramnad

**प्र.23 जर जागतिक तापमान $2^0$ से. वाढले तर पृथ्वीवर खालीलपैकी कोणते परिणाम होण्याची शक्यता आहे?**

(a) वार्षिक पूर
(b) कीटकांमुळे होणारे आजार जसे मलेरिया
(c) शेती विभागात बदल
(d) प्राणी आणि वनस्पतींच्या बऱ्याच प्रजाती नष्ट होतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) व (d) (2) (a), (b) व (c)
(3) (b), (c) व (d) (4) फक्त (d)

➨ **If global temperature rises by $2^0$C, which of the following effects can be seen on the earth?**

(a) Annual flooding
(b) Insect born diseases like Malaria
(c) Shift of agricultural regions
(d) Several species of plants and animals will become extinct

**Answer Options :**

(1) (a), (b), (c) and (d) (2) (a), (b) and (c)
(3) (b), (c) and (d) (4) only (d)

**प्र.24 खालील नकाशात पूर्व हिमालय प्रदेशातील चार पर्वत रांगा 1, 2, 3, 4 अंकांनी दाखविलेल्या आहेत. या पर्वत रांगांचा पश्चिमेकडून पूर्वेकडे कोणता क्रम बरोबर आहे?**




(1) बरालो, जयंतीया, खाशी, गारो
(2) गारो, खाशी, जयंतीया, बराली
(3) जयंतीया, खाशी, गारो, बराली
(4) खाशी, गारो, बराली, जयंतीया

➨ **The following map of Eastern Himalayan region shows four mountain ranges which are numbered as 1, 2, 3, 4. Which of the following sequences of these mountain ranges from West to East is correct ?**




(1) Barali, Jayantia, Khasi, Garo
(2) Garo, Khasi, Jayantia,Barali,
(3) Jayantia, Khasi, Garo, Barali
(4) Khasi, Garo, Barali, Jayantia

**प्र.25 खालीलपैकी कोणता विशेष गुणधर्म उष्ण व दमट विषुववृत्तीय हवामानात आढळत नाही?**

(1) येथे हिवाळा नसतो. (2) दुपारी पाऊस पडतो.
(3) वर्षभर सारखेच (Uniform) तापमान असते.
(4) प्रतिरोध पर्जन्य

➨ **Which of the following characteristics does not belong to the hot and wet equatorial type of climate?**

(1) There is no winter . (2) Afternoon Rains
(3) Uniform temperature throughout the year
(4) Orographic rain

**प्र.26 भारतात मासेमारी अत्यल्प प्रमाणात केली जाते कारण :**

(a) मोठ्या प्रमाणावर अन्नधान्यावर अवलंबून राहणे
(b) मासे साठवण्याच्या मर्यादित सोई
(c) सरकार मासेमारीस प्रोत्साहन देत नाही.
(d) जास्त चांगली बाजारपेठ नाही.

**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?**

(1) (a), (c) आणि (d) (2) (b), (c) आणि (d)
(3) (a), (b) आणि (d) (4) फक्त (c)

➨ **Fishing in India is poorly developed because:**

(a) Dependence on food crops
(b) Facilities for preservation of fish are limited.
(c) Government is not giving encouragement to develop fishing.
(d) Market is not much favourable .

**Which of the above statements are correct?**

**Answer Options :**

(1) (a), (c) and (d) (2) (b), (c) and (d)
(3) (a), (b) and (d) (4) Only (c)

**प्र.27 आपल्या देशाचे बरेच क्षेत्र मृदा धूपेमुळे प्रभावित आहे. मृदा धूपेखाली सर्वाधिक क्षेत्र असलेले राज्य कोणते?**

(1) राजस्थान (2) मध्य प्रदेश
(3) महाराष्ट्र (4) उत्तर प्रदेश

➨ **Soil erosion has affected large tracts of our country. Which is a state with the largest area under soil erosion ?**

(1) Rajasthan (2) Madhya Pradesh
(3) Maharashtra (4) Uttar Pradesh

**प्र.28 ऊसापासून साखर करताना उसाच्या एकूण वजनाच्या किती टक्के रूपांतर होऊ शकते?**

(1) 40 % (2) 30%
(3) 20 % (4) 10 %

➨ **How much percent weight of sugarcane can be converted into sugar ?**

(1) 40% (2) 30%
(3) 20% (4) 10 %

**प्र.29 खाली दिलेल्या भारताच्या नकाशात काढलेली दाट (thick) रेषा – दाखविते :**

(1) तांदूळ व गहू उत्पादन करणाऱ्या प्रदेशाचे विभाजन करणारी रेषा
(2) जल विभाजक
(3) समभूकंप तीव्रतादर्शक रेषा
(4) वरीलपैकी एकही नाही

➨ **The thick line drawn in the following map of India shows :**

(1) A line separating rice and wheat producing regions
(2) Water divide
(3) Isoseismal line
(4) None of the above

**प्र.30 खालील विधाने पाहावीत व त्यातील कोणते योग्य नाही ते सांगावे.**

(a) भारतात गाळाची मृदा सर्वात अधिक पसरलेली आहे.
(b) एकूणच गाळाची मृदा अत्यंत सुपीक असते.
(c) तिच्या वयोमानाप्रमाणे गाळाची मृदा 2 वर्गवारीत मोडते – जुनी– बांगर आणि नवी–खादर
(d) खादर मृदा बांगरपेक्षा अधिक सुपीक असते.
(e) गाळाच्या मृदेत पुरेशा प्रमाणात पोटॅश, फॉस्फोरिक ॲसिड व लाइम असते.
(f) गाळाची मृदा ऊस, भात, गहू व कडधान्यांकरता उत्कृष्ट असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (c) (2) (d)
(3) (e) (4) एकही नाही

➨ **Consider the following statements and state what is not true of the Alluvial Soils ?**

(a) Alluvial soils are most widely spread soils.
(b) Alluvial soils as a whole are very fertile.
(c) On the basis of their age they are classified into two - old : Bangar and new : Khadar.
(d) Khadar soils are more fertile than Bangar.
(e) Alluvial soils contain adequate proportion of potash, phosphoric acid and lime .
(f) Alluvial soils are ideal for sugarcane, paddy, wheat and pulses .

**Answer Options :**

(1) (c) (2) (d)
(3) (e) (4) None

**प्र.31 भारतातील काही प्रजाती पुढीलप्रमाणे :**

(a) वाघ (b) भारतीय चित्ता
(c) सॅलमेंडर (d) गीब्बन
(e) माळढोक (f) दोनशिंगी गेंडा

**वरीलपैकी कोणती/कोणत्या प्रजाती नष्ट झाली/झाल्या आहे/आहेत?**

(1) फक्त (b) (2) फक्त (c)
(3) फक्त (d) (4) (b) आणि (f)

➨ **Some of the species from India are as follows:**

(a) Tiger (b) Indian cheetah
(c) Salemender (d) Gibbon
(e) Great Indian Bustard
(f) Two homed Rhinoceros

**Which is/are the extinct species from India ?**

(1) only (b) (2) only (c)
(3) only (d) (4) (b) and (f)

**प्र.32 सुपोषण–बाबत विधाने**

(a) प्राथमिकरीत्या डोंगराळ भागातील वाहत्या पाण्यामध्ये सुपोषण होते.
(b) सुपोषण हे थांबलेल्या पाण्यात होते आणि त्यामध्ये जिवांचा आणि त्यांनी उत्पादित केलेल्या बाबींचा हळूहळू संचय होतो.
(c) सुपोषणामुळे तयार झालेल्या शेवाळाचा पुंज हा अन्न म्हणून उपयोग होऊन माशांच्या वाढीसाठी पोषक ठरतो.
(d) सुपोषित पाणी हे ऑक्सीजनसंपन्न असते आणि कुठलीही प्रक्रिया न करता मानवी वापरास सुरक्षित असते.

**वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने बरोबर आहेत?**

(1) फक्त (a) (2) फक्त (d)
(3) (b) आणि (c) (4) (a) आणि (d)

➨ **Statements about Eutrophication :**

(a) The eutrophication occurs in lotic water body primarily in hilly region.
(b) The eutrophication occurs in lentic water and there is gradual accumulation of organisms and their products.
(c) The eutrophication promotes fish growth as algal blooms serve as source of food to fishes.
(d) The eutrophicated water is oxygen rich and safe for human consumption without treatment.

**Which is/are the correct statement(s)?**

(1) only (a) (2) only (d)
(3) (b) and (c) (4) (a) and (d)

**प्र.33 शास्त्रज्ञांनी दिलेले वातावरण बदलांचे काही सिद्धांत खालीलप्रमाणे :**

(a) सर जॉर्ज सिम्पसन सिद्धांत
(b) सौर डागांच्या चक्रावर आधारित सिद्धांत
(c) खगोलशास्त्रविषयक सिद्धांत
(d) वातावरणातील वायू जे निवडक प्रकाशाचे किरण शोषून घेतात, त्याच्या बदलत्या प्रमाणावरचा सिद्धांत.

वातावरणबदलाच्या कोणत्या सिद्धांतानुसार पाच मूलभूत परिणाम ग्राह्य धरून त्यावर आधारित बर्फाळ प्रदेशातील बर्फाचे प्रसरण आणि आकुंचनाचे गणितीय मॉडेल दिले गेले आहे?

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

➨ **Following are some theories of climate change given by scientists :**

(a) Sir George Simpson theory
(b) Theory based on sunspot cycle
(c) Astronomical theory
(d) Variation in the quantities of radiation absorbed

by atmospheric gases selectively. In which theory of climate change, the five principle effects are considered and mathematical model for expansion and contractions of ice sheets has been given?

**Answer Options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

**प्र.34 वनस्पतीपासून मिळविलेल्या सजीवांमध्ये सक्रिय असणाऱ्या संयुगाची यादी :**

(a) निकोटीन – तंबाखू वनस्पतीपासून

(b) निबीडाईन – कडुलिंबापासून

(c) रोटीनोन – डेरिसइलिप्टिकापासून

(d) पायरीथ्रम – क्रायसँथमम सिनरीफोलीअमपासून आदिम लोकांनी वनस्पतीचे सार काढून, सजीवांमध्ये सक्रिय असणारे संयुग मिळविले व त्याचा वापर मासे स्तंभित करण्यासाठी केला?

**यासाठी वरीलपैकी कोणता पर्याय बरोबर आहे?**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

➨ **List of bioactive compounds obtained from plants :**

(a) Nicotine - from tobacco plant

(b) Nibidine - from neem plant

(c) Rotenone - from derris elliptica

(d) Pyrethrum-fromchry santhemum cincrariefolium The bioactive compound extracted from plant was used by primitive people for paralysing the fish.

➨ **Which of the above options was resorted to by them?**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

**प्र.35 जैवविविधतेच्या ऱ्हासासंबंधी घटक :**

(a) भूवापरातील बदलामुळे होणारा वसतिस्थानांचा ऱ्हास

(b) प्रदूषणामुळे होणारा वसतिस्थानांचा हास

(c) शिकार करणे

(d) रोग व साथीचे रोग पसरणे

(e) प्रजातीचा अति उपसा

**वरीलपैकी कोणता/कोणते घटक पाणी हे वसतिस्थान असणाऱ्या ठिकाणची जैवविविधता कमी होण्यास मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतो/ठरतात?**

(1) फक्त (d) (2) (a) आणि (d)

(3) (c) आणि (a) (4) (b) आणि (e)

➨ **Aspects related to the loss of biodiversity :**

(a) Habitat loss due to change in land use

(b) Habitat loss due to pollution

(c) Predation

(d) Outbreak of diseases and epidemics

(e) Excessive exploitation of species

**Which of the above is/are the major causative factor(s) for decreasing biodiversity from aquatic habitat ?**

(1) Only (d) (2) (a) and (d)

(3) (c) and (a) (4) (b) and (e)

**प्र.36 अनेक अंगी दारिद्र्य निर्देशांकाने 1997 मध्ये कोणत्या निर्देशांकाची जागा घेतली?**

(1) ग्राहक निर्देशांक

(2) भारतीय दारिद्र्य निर्देशांक

(3) दारिद्र्यखालील निर्देशांक

(4) मानवी दारिद्र्य निर्देशांक

➨ **Which of the following was replaced by multi-dimensional poverty Index in 1997 ?**

(1) Consumer Index

(2) Indian Poverty Index

(3) Below Poverty Index

(4) Human Poverty Index

**प्र.37 भारतातील भूअधिकार सुधारणा धोरणाचे खालीलपैकी कोणते ध्येय नव्हते ?**

(1) कूळवहिवाट सुधारणा (2) मध्यस्थांचे निर्मूलन

(3) शेतीविषयक वित्त (4) सहकारी शेती

➨ **Which of the following was not an objective of land reforms policy of India ?**

(1) Tenancy Reforms

(2) Abolition of Intermediaries

(3) Agricultural Finance

(4) Co-operative Farming

**प्र.38 खालील विधाने नियोजन आयोगाने दिलेल्या भारतीय दारिद्र्याच्या अंदाजासंबंधी आहेत.**

(a) भारतातील महत्त्वाच्या राज्यांमध्ये दारिद्र्याचे सकेंद्रण झालेले दिसते.

(b) शहरी दारिद्र्यातील घट ही ग्रामीण दारिद्र्याच्या घटीपेक्षा अधिक आहे.

(c) दारिद्र्याचा दर हा हिमाचल प्रदेश, हरियाणा आणि बिहारमध्ये वाढला आहे.

(d) नियोजन आयोगाने लकडावाला तज्ज्ञ गटाचे दारिद्र्याचे अंदाज मान्य केले आहेत.

**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?**

(1) (a) आणि (c) (2) वरील सर्व

(3) (b) आणि (c) (4) (c) आणि (d)

➨ **Following statements are regarding Planning Commission's estimates of poverty.**

(a) Poverty is showing high concentration in major states of India

(b) Rate of fall in urban poverty is higher than that in rural poverty.

(c) Poverty ratio has increased in the states of Himachal Pradesh, Haryana and Bihar.

(d) Planning Commission has accepted Lakdawala Expert Group estimates of poverty.

➨ **Which of the above statements are correct ?**

(1) (a) and (c) (2) All the above

(3) (b) and (c) (4) (c) and (d)

**प्र.39 आर्थिक प्रगतीसाठी वित्त उभे करण्याच्या खालीलपैकी कोणत्या पद्धतीमुळे भाववाढ निमाण होऊ शकते?**

(1) अंतर्गत आणि बहिर्गत कर्ज
(2) क्रमवर्धी करपद्धती
(3) तुटीची वित्तव्यवस्था
(4) सरकारी कर्जरोखे

➨ **Which of the following methods of financing economic development can lead to inflation ?**

(1) Internal and External Borrowings
(2) Progressive Taxation
(3) Deficit Financing
(4) Government Bonds

**प्र.40 दारिद्र्य तफावत गुणोत्तर हे शिरगणती गुणोत्तरापेक्षा निरपेक्ष दारिद्र्यमापनाचे जास्त चांगले मापक आहे कारण**

(1) कौटुंबिक उत्पन्नाचा तपशील उपलब्ध नसतो.
(2) किमान स्वास्थ्याच्या प्रमाणाची व्याख्या करणे कठीण आहे.
(3) ते निरपेक्ष दारिद्र्य दूर करण्यासाठी किती उत्पन्न तूट भरून काढावी लागेल हे दाखविते.
(4) वरीलपैकी कुठलेही नाही.

➨ **Poverty Gap is a better measure of absolute poverty than Head Count Ratio because :**

(1) Household income data is not available.
(2) It is difficult to define minimum health standards.
(3) It indicates total income shortfall that needs to be corrected to remove absolute poverty.
(4) None of the above

**प्र.41 जेव्हा आपण जातीच्या उत्क्रांतीचा विचार करत असतो तेंव्हा लक्षात ठेवावयास हवे की :**

(a) उत्क्रांती म्हणजे प्रगती
(b) उत्क्रांती वैविध्य निर्माण करते.
(c) जुन्या जाती अकार्यकुशलच असतील असे नाही.
(d) अधिकाधिक संमिश्र व काहीश्या क्लिष्ट प्रजाती निर्माण होतात.

**वरील कोणते विधान चुकीचे आहे?**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

➨ **When we are considering evolution of species let us remember that:**

(a) Evolution is progress.
(b) Evolution is generation of diversity.
(c) The older designs are not necessarily inefficient.
(d) More and more complex designs emerge.

**Which one of the above four statements is incorrect?**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

**प्र.42 रिओ अर्थ समीट, अजेंडा 21 ने खालीलपैकी कोणत्या विभागात कार्य करण्याचे आश्वासन दिले?**

(a) सामाजिक व आर्थिक मोजमाप जसे गरिबीचे निर्मूलन व अविनाशी शहर योजना
(b) महिला, स्थानिक सरकार व बिगरसरकारी संघटना यासारख्या महत्वाच्या घटकांचे सशक्तीकरण
(c) साधनांचे जतन व व्यवस्थापन जसे निर्वनीकरण थांबवणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) वरील सर्व (3) (b) (4) (c)

➨ **In which of the fields Agenda 21 of Rio Earth summit promised to pursue action.**

(a) Social and economic dimension such as combating poverty and sustainable urban planning.
(b) Strengthening the role of major groups such as women, local governments and NGO.
(c) Conservation and management of resources like combating deforestation.

**Answer Options :**

(1) (a) (2) All the above
(3) (b) (4) (c)

**प्र.43 भारतातील पशुधनाबाबत पुढील विधानांचा विचार करा :**

(a) भारतात जगातील सर्वात अधिक गाय बैल आहेत.
(b) भारतीय गायीला 'टी कप काऊ' म्हणतात कारण तिचे सरासरी दूध उत्पादन कमी आहे.
(c) जगातील सुमारे 50% म्हशी भारतात आहेत.
(d) भारतातील दूध उत्पादनातील जवळपास 50% उत्पादन म्हशींपासून मिळते.

**वरील कोणते विधान अयोग्य आहे ?**

(1) (b) (2) (c)
(3) (d) (4) एकही नाही

➨ **Consider the following statements about the livestock resources of India :**

(a) India has the largest number of cattle in the world.
(b) Indian cow is called 'tea-cup-cow' as average yield of milk per cow is poor.
(c) About 50 percent of the worlds total population of buffaloes is in India
(d) Buffaloes account for about 50 percent of milk production in India

**Which of the above statements is incorrect ?**

(1) (b) (2) (c) (3) (d) (4) None

**प्र.44 राष्ट्रीय लोकसंख्या धोरण 2000 चे तातडीचे उद्दिष्ट म्हणजे :**

(1) स्वास्थ्यविषयक पायाभूत सुविधांची गरज भागविणे
(2) एकूण जननदर कमी करणे
(3) लोकसंख्या स्थिर करणे
(4) वरील सर्व

➨ **The immediate objective of National Population Policy 2000 is to :**

(1) Meet the needs of health infrastructure
(2) Reducing the total fertility rate
(3) Stabilise the size of population
(4) All the above

**प्र.45 खालील विधाने भारतातील दारिद्र्याच्या संकल्पनेशी संलग्न आहेत :**

(a) दारिद्र्यरेषेची संकल्पना कॅलरीजच्या स्वरूपात मांडली आहे.

(b) दारिद्र्य आणि भूक या दोन्ही संकल्पना एकच आहेत.

(c) दारिद्र्यरेषा टोपली (Basket) मधील वस्तू आणि सेवांमधे बदल घडवून आणला गेला आहे.

(d) शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च समाविष्ट करण्यासाठी नवीन पद्धतीशास्त्र सुचवले गेले आहे.

**वरीलपैकी कोणती विधाने एस. डी. तेंडुलकर कमिटीच्या दारिद्र्य संकल्पनेनुसार बरोबर आहेत?**

(1) (a) आणि (d) (2) (b)

(3) (b) आणि (c) (4) (d)

➨ **Following statements relate to the definition of poverty in India :**

(a) Poverty line is defined in terms of calories.

(b) Poverty and hunger are one and the same.

(c) Poverty Line Basket (PLB) goods and services have been changed over time.

(d) New methodology to include expenditure on education and health is recommended.

**Which of the above statements is/are correct as per the definition of poverty given by S.D. Tendulkar Committee ?**

(1) (a) and (d) (2) (b)

(3) (b) and (c) (4) (d)

---

**प्र.46 सन 2045 पर्यंत लोकसंख्या स्थिरीकरण करण्यास्तव आपल्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाची सामाजिक व लोकसंख्यात्मक उद्दिष्टे काय आहेत?**

(a) मुलांचा मृत्यूदर 30 प्रति 1000 जन्मांपेक्षा कमी आणणे

(b) मुलींना विलंबाने लग्न करण्यास प्रवृत्त करणे

(c) एकूण प्रसूतींच्या 80% बाळंतपणे संस्थात्मक असावीत.

(d) 100 टक्के बाळंतपणे प्रशिक्षित व्यक्तींकडूनच व्हावीत.

(e) जन्मदर कमी करण्यास्तव कायद्याने लग्नाचे वय वाढविणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) आणि (d)

(2) (b), (c), (d) आणि (e)

(3) वरील सर्व

(4) (b), (c) आणि (d)

➨ **What are the socio-demographic goals of the National Population Policy to be achieved so as to have the population stabilized by 2045 ?**

(a) Reduce infant - mortality rate to below 30 per 1000 live births

(b) Promote delayed marriage in girls

(c) Achieve 80% institutional deliveries

(d) Achieve 100% deliveries by trained persons

(e) Legislation to raise the age of marriage to reduce the birth rate

**Answer Options :**

(1) (a) (b) (c) and (d) (2) (b) (c) (d) and (e)

(3) All the five (4) (b), (c) and (d)

---

**प्र.47 कृषी व सहकार विभागाने केशरी मोहीम (सॅफ्रन मिशन) सन 2010 ते 2014 मध्ये राबविण्यासाठी सुरू केली आहे, ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :**

(a) पुनर्लागवड (b) जमिनीची पोत सुधारणे

(c) पाणीपुरवठा वाढविणे

(d) हवामान अंदाज यंत्रणा विकास

(e) संशोधन व विस्तारात भर

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c), (d) (2) (a), (b), (c), (e)

(3) (a), (b), (d), (e) (4) (a), (c), (d), (e)

➨ **Department of Agriculture and Cooperation has initiated a Saffron Mission to be implemented from 2010 to 2014. What does it involve ?**

(a) Replanting

(b) Improving soil health

(c) Strengthening Irrigation

(d) Weather Station development

(e) Enhancing Research and Extension

**Answer Options :**

(1) (a), (b), (c), (d) (2) (a), (b), (c), (e)

(3) (a), (b), (d), (e) (4) (a), (c), (d), (e)

---

**प्र.48 राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण 2000 चा प्रयत्न :**

(1) बालिकांसंबंधी असलेले सर्व भेदभाव व महिलांवर होणारे सर्व प्रकारचे अत्याचार दूर करणे

(2) महिलांना मानवी हक्क आणि सत्तेत समान संधी प्रदान करणे

(3) वरील दोन्ही

(4) वरीलपैकी कुठलेच नाही

➨ **The National Policy for Empowerment of Women (2000) seeks to :**

(1) Eliminate discrimination against girl child and all forms of violence against women

(2) Grant women human rights and equal opportunities in power sharing

(3) both (1) and (2) above

(4) None of the above

---

**प्र.49 11 व्या पंचवार्षिक योजनेतील राष्ट्रीय कृषी विकास योजनेचे प्रमुख उद्दिष्ट कोणते ?**

(1) राज्य सरकारला कृषी व इतर क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे

(2) भारतीय कृषी निर्यातदारांना सवलती देणे

(3) सरकारसाठी महसूल निर्माण करणे

(4) वरीलपैकी कोणतेही नाही

➨ **The main objective of Rashtriya Krishi Vikas Yojna in 11th five year plan was :**

(1) To incentivise the states to increase public investment in agriculture and allied sectors
(2) To provide incentive to Indian agricultural exporters
(3) To generate revenue for the Government
(4) None of the above

**प्र.50 खालील विधाने सहस्त्रकातील विकासाच्या उद्दिष्टांच्या (स.वि.उ.) संदर्भातील आहेत.**
(a) संयुक्त राष्ट्रांची स.वि. उ. ची पूर्तता 2015 पर्यंत करायची आहे.
(b) स.वि.उ. चे एक उद्दिष्ट म्हणजे पिण्याचे सुरक्षित पाणी न मिळणाऱ्यांची संख्या निम्म्याने कमी करणे
(c) मुक्त आणि रास्त व्यापार
(d) एकूण आठ स.वि.उ. आहेत.

**वरील कोणती विधाने खरी आहेत?**
(1) वरील सर्व (2) (a), (b) आणि (c)
(3) (a), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (d)

➨ **Following statements relate to the Millennium Development Goals (MDGs) :**
(a) UN MDGs are to be achieved by 2015.
(b) One of the MDGs is to reduce the world's population suffering from lack of safe drinking water by 50%.
(c) Free and fair trade among all nations
(d) There are eight MDGS.

**Which of the above statements are true ?**
(1) All the above (2) (a), (b) and (c)
(3) (a), (c) and (d) (4) (a), (b) and (d)

**प्र.51 खालील वाक्ये विचारात घ्या.**
**केशीकत्व घटना नसेल तर ......**
(a) टीप कागद त्याचे कार्य करणार नाही.
(b) रॉकेलचा दिवा वापरणे अवघड होईल.
(c) सभोवताली दिसणारी झाडे पृथ्वीवर वाढणार नाहीत.
(d) शहरात नळाद्वारे पाणी वाहण्याची शक्यता नाही.

**वरीलपैकी कोणती वाक्ये बरोबर आहेत?**
(1) फक्त (a), (b) व (c) (2) फक्त (b), (c) व (d)
(3) फक्त (a), (c) व (d) (4) फक्त (a), (b) व (d)

➨ **Consider the following statements : If capillarity phenomenon did not exist .....**
(a) The blotting paper would fail to function.
(b) It would be difficult to use kerosene lamp.
(c) The trees that we see around would not have grown on earth .
(d) The water cannot flow through pipes in cities.

**Which of the given statements are correct ?**
(1) (a), (b) and (c) only
(2) (b), (c) and (d) only
(3) (a), (c) and (d) only
(4) (a), (b) and (d) only

**प्र.52 खालील वाक्ये लक्षात घ्या.**
(a) कणाची वेधनशक्ती (सामर्थ्य) ही त्याच्या वस्तुमानाच्या व्यस्त प्रमाणात असते.
(b) अल्फा कणाची वेधनशक्ती (सामर्थ्य) ही बीटा कणाच्या वेधन शक्ती (सामर्थ्य) पेक्षा कमी आहे.

**खालीलपैकी कोणते विधान वरील वाक्यांची परिस्थिती योग्यरीत्या दाखवते?**
(1) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत आणि पहिले वाक्य दुसऱ्या वाक्याचे स्पष्टीकरण आहे.
(2) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत आणि दुसरे वाक्य पहिल्या वाक्याचे स्पष्टीकरण आहे.
(3) पहिले वाक्य बरोबर व दुसरे वाक्य चूक आहे.
(4) दुसरे वाक्य बरोबर व पहिले वाक्य चूक आहे.

➨ **Consider the following statements :**
(a) Penetrating power of a particle is inversely proportional to its mass.
(b) Penetrating power of (alpha) particle is less than that of (Beta) particle.

**Which one of the following gives a correct picture about the above statements ?**
(1) Both the statements are true and statement one is an explanation of the statement two.
(2) Both the statements are true and statement two is an explanation of statement one.
(3) Statement one is true and two is false.
(4) Statement two is true and one is false.

**प्र.53 खालील धातू विचारात घ्या.**
(a) प्लॅटिनम (b) सोने
(c) तांबे (d) शिसे

**चढत्या घनतेनुसार त्याची क्रमवारी लिहा :**
(1) (c), (d), (b), (a) (2) (d), (c), (b), (a)
(3) (a), (b), (c), (d) (4) (c), (d), (a), (b)

➨ **Consider the following metals :**
(a) Platinum (b) Gold
(c) Copper (d) Lead

**Their correct arrangement in the increasing order of density is :**
(1) (c), (d), (b), (a) (2) (d), (c), (b), (a)
(3) (a), (b), (c), (d) (4) (c), (d), (a), (b)

**प्र.54 डायक्लोरोडायफेनिल ट्रायक्लोरो इथेन (डीडीटी) सर्वप्रथम क्लोरिनेटेड ऑरगॅनिक कीटकनाशक असून परिणामकारक कीड नष्ट करणाऱ्या त्याच्या गुणांकरता पॉल मुलर यांना मेडिसीन व फिजिऑलॉजीचे 1948 चे नोबेल पारितोषक प्रदान करण्यात आले.**
(a) डीडीटी मलेरिया पसरविणाऱ्या मच्छरांविरुद्ध परिणामकारक आहे.
(b) डीडीटी टायफस वाहतूक करणाऱ्या उवांविरूद्ध (lice) परिणामकारक आहे.

(c) डीडीटी पाण्यातील माशांकरिता अत्यंत विषारी आहे.

(d) प्राणीजन डीडीटीचे सहज चयापचय प्रक्रिया (पृथक्करण) करू शकत नाहीत.

**वरील कोणती विधाने खरी आहेत?**

(1) (a) व (c) (2) (a) व (d)

(3) (a), (c) व (d) (4) (a), (b), (c) व (d)

➨ **Dichlorodiphenyl Trichloro Ethane (DDT) is the first chlorinated organic insecticide for the discovery of its effectiveness as an insecticide. Paul Muller was awarded Nobel Prize in Medicine and physiology in 1948.**

(a) DDT is effective against mosquitos that spread malaria

(b) DDT is effective against lice that carry typhus.

(c) DDT has high toxicity towards fish.

(d) DDT is not metabolised easily by animals.

**Which of the above statements are correct ?**

(1) (a) and (c) (2) (a) and (d)

(3) (a), (c) and (d) (4) (a),(b),(c) and (d)

**प्र.55 खालीलपैकी कोणते विधान सत्य नाही?**

(1) कार्बन डाय ऑक्साईड लेसरचा (CO, LASER) उपयोग स्टेनलेस स्टीलचे तुकडे करण्यासाठी करु शकतो.

(2) मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग (MRI) तंत्रज्ञानाचा उपयोग मेंदूच्या तंतोतंत प्रतिमा काढण्यासाठी केला जातो आणि त्यामध्ये उत्सर्जन क्रिया वापरली जात नाही.

(3) शत्रूची क्षेपणास्त्रे शोधण्याकरिता रडार यंत्रणा उपयोगात आणली जाते.

